अदानी इलेक्ट्रिकसिटीमध्ये २०१६ पासून कामगारांचा वेतन करार करण्यास व्यवस्थापनाची टाळाटाळ

राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालय येथे त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजीव जाधव, अवर सचिव महेश वाव्हळ, कक्ष अधिकारी ल.ना. सदाफुले आदी उपस्थित होते.

प्रतिनिधी

■ **मुंबई**

मुंबईच्या उपनगरात वीज पुरवठा करणाऱ्या अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई या मुंबई उपनगर वीज कंपनीमधील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर समझोता करार करण्यासाठी बेमुदत संप आंदोलन छेडण्या करीता स्थायी व कंत्राटी कामगारांचे मतदान १२ सप्टेंबर रोजी घेण्याचा व कामगारांनी संपाच्या बाजूने कौल दिल्यास १४ सप्टेंबर रोजी अदानी इलेक्ट्रिक सिटी व्यवस्थापन, कामगार आयुक्त, कामगार मंत्री यांना बेमुदत आंदोलनाची तारीख जाहीर करून नोटीस दिली जाईल, अशी घोषणा मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनचे सरचिटणीस विठ्ठलराव गायकवाड यांनी केली आहे.

अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी आस्थापनामधील कामगारांची मान्यताप्राप्त व प्रातिनिधीक संघटनेचा दर्जाअसलेल्या मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर सध्याच्या अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी व्यवस्थापना समवेत १९ सप्टेंबर २०१६ रोजी वेतनवाढ व सोयी - सवलतीचा करार केला आहे. कराराअन्वये पॉवरलॉस भत्याची पुनर्रचना व वाढ करण्याचा समझोता केला जाईल , कंत्राटी कामगारांना सेवा ज्येष्ठतेनुसार कायम पदावर घेतले जाईल, स्थायी कामगारांच्या एका मुलास अथवा मुलीस कंपनीच्या सेवेमध्ये सामावुन घेतले जाईल, आर.एच.आर.एस , जी.आय.एस. पद्धतीने काम करणारे कामगार व माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये काम करणाऱ्या कामगारांना कायम पदावर सामावून घेतले जाईल, सुधारीत पदोन्नती धोरण अंमलात आणले जाईल. रिक्त असलेली सर्व पदे भरण्याची तरतुद करारामध्ये केलेली आहे. करारामधील सर्व प्रलंबित प्रश्न दोन महिन्याच्या आत सोडविण्याचे अदाणी इलेक्ट्रिसिटी कंपनी व्यवस्थापनाने दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ रोजी लेखी समझोता युनियन समवेत केला आहे. समझोत्याची

युनियन बेमुदत संपाच्या पवित्र्यात

अंमलबजावणी केली जात नाही, म्हणून कंपनीमधील कामगारांनी नियमाप्रमाणे काम आंदोलन सुरू केले. म्हणून अदाणी व्यवस्थापनाने मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन समवेत २० फेब्रुवारी २०१९ रोजी सामंजस्य (एम.ओ.यु) करार केले. त्या करारामध्ये ०२ एप्रिल २०१९ पासून कामगार भरती सुरु करण्यात येईल. बढतीचे सुधारित धोरण अंमलात आणण्याचे व रिक्त पदे भरण्यात येतील, पॉवरलॉस भत्याचा समझोता करार केला जाईल. प्रलंबित मागणी पत्रावर करार केला जाईल असे (एम.ओ.यू.) करारामध्ये ३१ मार्च २०१९ पर्यंत अंमलबजावणी करण्याचे करारामध्ये ठरले आहे. सामंजस्य (एम.ओ.यू) कराराची अंमलबजावणी करावी म्हणून युनियनने अदाणी व्यवस्थापन , कामगार आयुक्त, राज्य विद्युत नियामक मंडळ व महाराष्ट्र शासनास अनेक वेळा पत्र व्यवहार केला. परंतु अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी व्यवस्थापन चर्चा करून निर्णय घेणास तयार नाही. असे विठ्ठलराव गायकवाड यांचे म्हणणे आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणाऱ्या कामगारांना ५० लाख रुपये रक्कमेचे विमा कवच देण्याच्या निर्णयाची अंमबजावणी करण्यास व्यवस्थापन तयार नाही. जीव धोक्यात घालून अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कामाच्या दिवसाचा मोबदला दिला नाही. अत्यावश्यक सेवेमध्ये कामावर येणाऱ्या कामगार. अधिकाऱ्यांना कामावर येण्या - जाण्यासाठी व काम करण्यासाठी केलेल्या प्रवासाचे भाडे रक्कम गेल्या सहा महिन्यापासून दिली नाही. कोरोनाने बाधीत होवून मृत पावलेल्या कामगारांच्या वारसांना ५० लाख विम्याची रक्कम दिली नाही. मृत पावलेल्या कामगारांच्या मुला-मुलीना अथवा वारसांना नोकरीमध्ये सामावून घेण्याचा निर्णय घेतला जात नाही. पाच वर्षांपासून सलग व सतत काम करणाऱ्या एक हजार कंत्राटी कामगारांना लॉकडाउन काळामध्ये कामावरून काढून टाकण्याची अनिष्ठ प्रथा अदाणी व्यवस्थापनाने राबविली आहे. पाच हजार नऊशे कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेची रक्कम ठेकेदारांनी भरावी म्हणून नवीन कोड नंबर काढण्याचे आदेश ठेकेदारांना देण्याची अनिष्ठ प्रथा अंमलात आणली आहे. सन २०१९-२० सालामध्ये वीज वितरण घट ७.३७ टक्यापर्यंत कमी आणल्यामुळे कंपनीमधील स्थायी व कंत्राटी कामगारांना २५ टक्के दराने बोनस (सानुग्रह अनुदान) रक्कम दिवाळीपूर्वी देण्याचा करार करावा. या व इतर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी बेमुदत संप करण्यासाठी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनीमधील स्थायी व कंत्राटी कामगारांच मतदान १२ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ८ पासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत टिळकनगर झोन, सांताक्रूझ झोन, एम.आय.डी.सी अंधेरी झोन, दिंडोशी झोन कांदिवली झोन व मिरा भाईदर झोनमध्ये घेण्यात येणार असल्याची नोटीस अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी व्यवस्थापन व कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना दिली आहे.

मत मोजणी १३ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी १० वाजेपासून भारत कुंज बिल्डींग , ३ रा माळा , सांताक्रूझ (पूर्व), मुंबई -४०० ०५५ या युनियनच्या सभागृहामध्ये घेण्यात येणार आहे . मतदान निर्णय आयुक्त म्हणुन मुंबई उच्च न्यायालयाचे वकिल किशोर शेट्टी हे मतदान निर्णयाचे कामकाज पाहणार आहेत. कामगारांनी संपाच्या बाजुने मतदान केले तर १४ सप्टेंबर २०२० रोजी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी व्यवस्थापन, कामगार आयुक्त, कामगार मंत्री यांना बेमुदत आंदोलन तारीख जाहीर करून नोटीस दिली जाणार आहे. असेही विठ्ठलराव गायकवाड यांनी सांगितले.

‘कोरोना याद्धा’ सन्मानपत्राने शिक्षकांचा गौरव

■ **अंबरनाथ**

कोरोना महामारीच्या काळात शिक्षकांनी दिलेल्या योगदानाबद्दल अंबरनाथमध्ये भाजपाच्या वतीने जिल्हा परिषद व नगर परिषद शाळेतील शिक्षकांना ‘कोरोना योद्धा’ सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून अंबरनाथ पूर्वेकडील भाजपा जनसंपर्क कार्यालयात सामाजिक अंतराचे भान राखून शिक्षकांना गौरविण्यात आले. मानवतेच्या भावनेतून शिक्षकांनी कोरोना संकट काळात दिलेले योगदान अनमोल असल्याची भावना भाजपाचे अंबरनाथ शहराध्यक्ष अभिजीत करंजुले-पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी भाजपा सरचिटणीस दिलीप कणसे, व्यापारी महासंघांचे अध्यक्ष खानजी धल,भाजपा शिक्षक आघाडीचे अध्यक्ष शैलेश सकपाळ, संतोष शिंदे, नितीन परब,तुषार मोरे, घोलप, श्रिकांत रेड्डी, महिला आघाडीच्या मंजू धल आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मनोर पोलीस ठाण्यातील नऊ पोलीस कोरोनाच्या विळख्यात

संतोष पाटील

■ **पालघर**

पालघर जिल्ह्यात कोरोना संक्रमाणाची स्थिती भयावह बनत चालली असून शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही कोरोनाचा विळखा वाढत आहे. सामान्यान बरोबर शासकीय कर्मचारी तसेच अहोरात्र कार्यरत असलेले पोलीसही कोरोनाच्या विळख्यात येत आहेत.

गणेशोत्सव आणि मोहर्रम काळात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कर्तव्यावर असताना पोलिस अधिकारी आणि कर्मचारी अनेकांच्या संपर्कात आले होते.

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने केलेल्या कोरोना चाचणीत रविवारी (ता.०६) मनोर पोलीस ठाण्यातील नऊ कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. उत्सव काळातील बंदोबस्ता दरम्यान अनेकांशी संपर्कात आल्याने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कोरोना चाचणी करण्याचे आदेश पालघरच्या पोलीस अधीक्षकांनी दिले होते. मनोर पोलिस ठाण्यात कार्यरत चार अधिकारी आणि ४८ कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपूर्वी पालघरच्या ग्रामीण रुग्णालयात कोरोना चाचणीसाठी घश्याचे नमुने दिले होते. कोरोना चाचणी अहवालात नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणूची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नऊ कर्मचाऱ्यांपैकी कुणालाही कोरोना लक्षणे नसल्याची माहिती मनोर पोलिसांनी दिली. कोरोना पॉझिटिव्ह कर्मचाऱ्यांना उपचारासाठी विक्रमगड तालुक्यातील पाली येथील कोव्हीड सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. जुलै महिन्यात पोलिसांच्या ताब्यातील दोन आरोपींची कोरोना चाचणी पॉझिटिव्ह आल्याने मनोर पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांसह बारा कर्मचाऱ्यांचे विलगीकरण करण्यात आले होते. परंतु कोरोना तपासणी अहवाल निगेटिव्ह आला होता.

पर्यावरण स्नेही गणेश मूर्ती ऑनलाईन निकाल जाहीर

जतिन कदम

■ **सफाळे**

ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास साधता येतो व त्यासाठी राजगुरू ह.म. पंडित विद्यालयात पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा शाळेने इयत्ता ५वी ते ७ वी व इयत्ता ८ वी १० वी या दोन गटांत ठेवली होती. शाळेचे कलाशिक्षक लीलाधर रायसिंग यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेची नियमावली ठरविण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्पर्धेला प्रतिसाद देत पर्यावरण पुरक शाडूमाती, चिकण माती, पुठ्ठ्याच्या लगद्यापासून, मैदा, हळद, पाना- फुलांची सजावट साकारून आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका मेघा वर्तक, उपमुख्याध्यापक राजन घरत व पर्यवेक्षक विलास पाटील यांचे स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेचा निकाल :

गट इ. ५ वी ते इ. ७ वी

प्रथम क्रमांकः- कु. सक्षम पुंडलीक घरत इ. ७ वी ब
द्वितीय क्रमांकः- कु. स्वराज जतिन कदम इ. ५ वी अ
तृतीय क्रमांकः- कु. सृष्टी बाळू किणी ७ वी अ
उत्तेजनार्थ प्रथमः- कु.हिमाली लीलाधर रायसिंग इ. ५ वी अ
उत्तेजनार्थ द्वितीयः- केवल निलेश घरत ६ वी ब

गट इ.८ वी ते इ.१० वी

प्रथम क्रमांकः- कु. सुषमा दशरथ बरड इ. १० वी क
द्वितीय क्रमांकः- कु. तुषार लिलाधर रायसिंग इ.८ वी अ
तृतीय क्रमांकः- कु. जुई प्रशांत दवणे इ. १० वी अ
उत्तेजनार्थ प्रथमः- कु. अर्पिता विनोद साळवे इ.८ वी अ
उत्तेजनार्थ द्वितीयः- कु. रिद्धी अमरजीत जयस्वाल इ. ९ वी ड

मराठमोळ्या निलेश कांबळीचा सातासमुद्रापार सन्मान!

■ **चिपळूण**

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणचा टेनिस क्रिकेट खेळाडू निलेश कांबळीचा ऑस्ट्रिया देशातील प्रथमश्रेणीच्या सामन्यांमध्ये तसेच युरोपियन लिगच्या अंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पंच म्हणून उल्लेखनिय कामगिरीचा ऑस्ट्रियन क्रिकेट ओसिसिएशन तर्फे नुकताच सन्मान करण्यात आला. ऑस्ट्रियन क्रिकेट संघटनेच्या पंच प्रशिक्षण उपक्रमातील स्टेज १ व स्टेज २ च्या परिक्षा पार करत निलेशने येथील स्थानिक टी २० तसेच ५० षटकांच्या सामन्यांमध्ये पंच म्हणून प्रभावी कामगिरी केली आयसीसी च्या युरोपियन देशांमधील क्रिकेटच्या प्रसाराच्या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या युरोपियन क्रिकेट लीगच्या ऑस्ट्रियातील व्हीएन्ना येथे झालेल्या जर्मनी -ऑस्ट्रिया आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेट संघांदरम्यानच्या सामन्यातही मॅच ऑफीशियल म्हणून त्याने अचूक कामगिरी पार पाडली. याचाच गौरव ऑस्ट्रियन क्रिकेट संघटनेचे चेअरमन यांचे हस्ते विशेष कामगिरीचे प्रशस्तिपत्रक देऊन निलेशला गौरवण्यात आले. या गौरवात निलेश कांबळी याने पंच म्हणून केलेल्या निपक्षपाती व अचुक कामगिरीचे कौतुक केले असून यापुढे आयसीसीच्या देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पंचांची जबाबदारी देण्यासाठीही शिफारस करण्यात आली आहे. कापसाळ चिपळुण येथे जन्मलेल्या निलेशने चिपळुण च्या दातार महाविद्यालयातून कला शाखेत पदवी घेऊन सावर्डे येथे व्यवस्थापनातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. आपल्या अष्टपैलू खेळाने त्याने डीबीजे महाविद्यालयाच्या संघाला आंतरमहाविद्यालयीन सीके नायडु स्पर्धा तसेच मुंबई विद्यापीठ झोनल लेव्हलचेही जेतेपद मिळवून दिले होते. निलेशने रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध टेनिस खेळाडू असलेला मोठा बंधू नंदु कांबळी याच्यासोबत स्थानिक टेनिस क्रिकेट स्पर्धांमध्ये ऑल राऊंडर म्हणून आपला वेगळा ठसा उमटवला. मुंबईत एल अँड टी, सिमेन्स इ. आयटी कंपन्यांमध्ये कार्यरत असताना लेदर बॉलच्या कॉर्पोरेट क्रिकेट लिगमध्ये सहभागी होत प्रभावी कामगिरी केली. सध्या निलेश युनायटेड नेशन्सच्या आयएइए आस्थापनेच्या ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथील हेड क्वार्टर मध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत आहे.

लहानपणापासून खेळाची आवड जोपासणाऱ्या निलेशने स्थानिक टेनिस क्रिकेटमध्ये चिपळूणच्या इलेव्हन फायटर्स, सुधीर इलेव्हन तसेच रत्नागिरीच्या आवाज संघाचे प्रतिनिधित्व केले. आपल्या कर्तृत्वाने एवढ्या उंचीवर असताना आपल्या यशाचे श्रेय कोकणा असणाऱ्या मातृभूमीतील टेनिस क्रिकेटच्या सहकाऱ्यांना देतो.

निलेशची यशस्वी घोडदौड पाहता चिपळूणचा हा सुपुत्र भविष्यात सायमन टोफेलच्या बरोबर पंच म्हणून आंतरराष्ट्रीय सामन्यात दिसेल आणि रत्नागिरीसह महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवेल अशी खात्री त्याच्या सर्व सहकाऱ्यांना वाटते. चिपळूणसारख्या छोट्या शहरातील युवकाने सातासमुद्रापार मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल सर्वत्र त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

नरवीर तानाजी मालुसरे स्मृतिस्थळाचे नित्य पूजारी ह. भ. प. केशवबुवा कळंबे यांचे निधन

■ **मुंबई**

रायगड जिल्हा पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे स्मृतिस्थळ आणि भव्य पूर्णाकृती पुतळ्याचे नित्य पूजा अर्चा करणारे ह भ प केशवबुवा हरी कळंबे यांचे ५ सप्टेंबर रोजी मुंबई येथील जे जे हॉस्पिटलमध्ये वयाच्या ७२व्या वर्षी अस्थमाच्या आजाराने दुःखद निधन झाले. रायगड जिल्हा परिषदेच्या रायगड किल्ला पूजा निधी ट्रस्टच्या वतीने केशवबुवा यांची नेमणूक झाल्यानंतर गेली ४० वर्षेहून अधिक वर्षे ते समाधी स्थळाची नित्यनियमाने पूजा करीत होते.छत्रपती शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, प्रतापगड, चंद्रगड, कांगोरीगड यांचा इतिहास ते येणाऱ्या शिवप्रेमींना स्वाभिमानाने सांगत असत. त्याचबरोबर गावातील मंदिराच्या देखभालीसह इतर दैवतांची पुजाही त्यांनी केली. अत्यंत शांत व संयमी असणारे हे व्यक्तिमत्त्व प्रवचन आणि किर्तनकार सुद्धा होते.

त्यांच्या पश्चात एक मुलगी, व दोन मुलगे,सुना व नातवंडे असा परिवार आहे. अंत्ययात्रेला रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, पोलादपूर तालुका शिवसेना प्रमुख निलेश अहिरे, शेकापचे ज्येष्ठ नेते निवृत्ती उतेकर, नरवीर युवक प्रतिष्ठानचे अनिल मालुसरे, ह.भ.प. आनंदबुवा झाडाणे आदी समाजातल्या विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

इनोव्हेटर्स फॅसॅडे सिस्टिम्स लिमिटेड

सीआयएनः एल४५२००एमएच१९९९पीएलसी१२०२२९
नोंदणी कार्यालय: २०४, बी-६५, सेक्टर क्र. १, शांती नगर, मीरा रोड (पूर्व),
ठाणे- ४०११०७. संपर्क : +९१ २२ २८११ २५२१ फॅक्स: ०२२-२८१३१९१९
ईमेल: investors@innovators.in संकेतस्थळ: www.innovators.in

कंपनीच्या सभासदानी लक्ष देण्यासाठी सूचना
२१ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीच्या सभासदांची २१ वी वार्षिक सर्व्साधारण सभा व्हिडियो कॉन्फरसिंग (‘व्हीसी’)/ अन्य ऑडियो-व्हिज्युअल माध्यम (ओएव्हीएम) द्वारे **बुधवार, ३० सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वा.** घेण्यात येणार आहे. कोविड १९च्या उद्रेकामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता आणि सामजिक अंतर राखण्याच्या दृष्टीने कंपनी व्यवहार मंत्रालयाने त्यांच्या परिपत्रक दिनांकित एप्रिल ०८, २०२०, एप्रिल १३, २०२० आणि मे ०५, २०२० अनुसार एजीएममध्ये देण्यात आलेल्या व्यवसायांवर विचार करण्यासाठी व्हिडियो कॉन्फरसिंग (‘व्हीसी’)/ अन्य ऑडियो-व्हिज्युअल माध्यम (ओएव्हीएम) द्वारे घेण्याची अनुमती देण्यात आली आहे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे हजर राहाणाऱ्या सभासद ह्यांची कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ च्या अंतर्गत गणपूर्तीच्या कारणासाठी मोजणी करण्यात येईल.
आर्थिक वर्ष २०१९-२० साठीच्या वार्षिक अहवालाच्या सह एजीएम बोलाविणारी सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे सर्व सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद डिपॉझिटरी पार्टीसिपंट (‘डीपी’) /कंपनी/रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट म्हणजेच लिंक इनटाईम इंडिया ह्यांच्याकडे नोंदणी करण्यात आलेली आहे त्यांना पाठविण्याचे काम सोमवार, ०७ सप्टेंबर २०२० रोजी पूर्ण करण्यात आले आहे. सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या www.innovators.in ह्या संकेतस्थळावर आणि www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहे. त्याशिवाय सदर सूचना लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान प्रणाली पुरवणारी एजन्सी) ह्यांच्या www.instavote.linkintime.co.in वर देखील उपलबद्ध आहे. सूचनमध्ये देण्यात आलेली सर्व कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तपासणीसाठी सूचना पाठविण्याच्या दिनांकापासून बुधवार **३० सप्टेंबर २०२०** पर्यंत उपलब्ध आहेत. सभासद ज्यांना अशी कागदपत्रे तपासायची आहेत त्यांनी त्यासाठी investors@innovators.in वर मेल करावा.
कं कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम ४२ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ च्या मान्यतेच्या अनुसार कंपनीच्या वार्षिक सर्व साधारण सभेच्या कारणासाठी **२४ सप्टेंबर २०२० पासून ३० सप्टेंबर २०२० पर्यंत** (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.
सभासद ज्यांनी बुधवार २३ सप्टेंबर २०२० ह्या कट ऑफ दिनांकाच्या अनुसार अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे त्यांना त्यांचे मत लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीवरून (दूरस्थ ई-मतदान) एजीएमच्या ठिकाणाशिवाय अन्यत्र कोणत्याही ठिकाणाहून मतदान करता येईल.
कंपनी कायद्याच्या कलम १०८, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम २० सेक्रेटरियल स्टँडर्ड आणि सेबी च्या नियामावली ४४ च्या मान्यतेच्या अनुसार लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड द्वारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ई-मतदान सुविधेच्या द्वारे एजीएमच्या ठिकाणी व्यवसायाच्या संदर्भात विचार करण्यसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
दूरस्थ ई-मतदानाची सुरवात शनिवार, २६ सप्टेंबर २०२० (सकाळी ९.०० वा. भाप्रवे) ला सुरु होईल आणि मंगळवार २९ सप्टेंबर २०२० (सायं. ५.०० वा.) समाप्त होईल. त्यानंतर दूरस्थ ई-मतदान प्रणाली अकार्यक्षम करण्यात येईल. सभासदाने ठरवावर एकदा मतदान केल्यानंतर त्याला ते परत बदलता येणार नाही.
सभासद ज्यांनी त्यांचे मतदान एजीएमच्या पूर्वी दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे केले आहे त्यांना व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होता येईल परंतु पुन्हा मतदान करण्यास ते पात्र नसतील.
सभासद जे एजीएमला उपस्थित आहेत आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना एजीएमच्या दरम्यान ई-मतदानाच्या द्वारे ठरवावर त्यांचे मतदान करता येईल. एजीएमच्या दरम्यान ई-मात्दानासाठीची तपशिलवार प्रक्रिया सुचनेमध्ये नमूद करण्यात आली आहे.
कोणीही व्यक्ती, ज्यांनी कंपनीचे समभाग अधिग्रहित केले आहेत आणि कंपनीची सभासद एजीएमची सूचना पाठविण्यात आल्या नंतर झाले आहेत आणि कट ऑफ दिनांक म्हणजेच **बुधवार २३ सप्टेबर २०२०** पूर्वी भागधारणा केली आहे त्यांना instameet@linktime.co.in ह्या मेल आयडीवर मेल पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करता येईल. तथापि, जर व्यक्ती ह्यापूर्वीच जर नोंदणीकृत असल्यास त्यांना मतदान करण्यसाठी त्यांच्या सध्याच्या युजर आयडी आणि पासवर्ड वापरता येईल.
सर्व सभासदांसाठी दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यासाठी तपशिलवार सूचना आणि प्रक्रिया आणि ज्या सभासदांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद (डीपी/कंपनी/आरटीए ह्यांच्याकडे) केलेली नाही त्यांच्यासाठीची देखील प्रक्रिया सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली आहे.
सदर जाहीरात कंपनीच्या www.www.innovators.in वर उपलब्ध आहे आणि स्टॉक एक्स्चेंज च्या **www.bseindia.com** वर देखील उपलब्ध आहे.

इनोव्हेटर्स फॅसॅडे सिस्टिम्स लिमिटे, करीता
संचालक मंडळाच्या आदेशाच्या द्वारे
सही/ -
राधेश्याम शर्मा
व्यवस्थापकीय संचालक

दिनांक: ०८ सप्टेंबर, २०२०
ठिकाण: मुंबई

झेनिथ स्टील पाईप्स अँड इंडस्ट्रीज लिमिटेड

(पूर्वी झेनिथ बिर्ला (इंडिया) लिमिटेड म्हणून ज्ञात)
(सीआयएनः एल२९२२०एमएच१९६०पीएलसी०११७७३)
नोंदणी. कार्यालय: ५वा मजला, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रेक्लमेशन, मुंबई- ४०००२०.
ई-मेल:zenith@zenithsteelpipes.com; संकेतस्थळ: www.zenithsteelpipes.com
दूर. क्र.: ०२२-६६६१६८४००, फॅक्स: ०२२-२२०४७८३५

५८ व्या वार्षिक सर्व साधारण सभा(एजीएम), बुक क्लोझर आणि ई-मतदान माहितीची सूचना
५८वी वार्षिक सर्व साधारण सभा

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहेकीझेनिथ स्टील पाईप्स अँड इंडस्ट्रीजलिमिटेड(पूर्वी झेनिथ बिर्ला (इंडिया) लिमिटेड म्हणून ज्ञात) ५८ वी वार्षिक सर्व साधारण सभा, कंपनी व्यवहार मंत्रालयाद्वारे पारित करण्यात आलेल्या साधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, १७/२०२० आणि २०/२०२० आणि व्यवहार आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या (सेबी) द्वारे पारित करण्यात आलेले परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सिएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित१२ मे २०२० मान्यतेच्या अनुसार सार्वजनिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय मंगळवार, २९ सप्टेंबर २०२० रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत घेण्यात येणार आहे. सभासदांनावार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये पाठविण्याचे काम ५ सप्टेंबर २०२० रोजी पूर्ण करण्यात आले आहे. वार्षिक अहवाल २०१९-२० साठीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना कंपनीच्या www.zenithsteelpipes.com वरतसेच एनएसडीएल www.evoting.nsdl.com वरत्याची प्रत उपलब्ध असून स्टोक एक्स्चेंजच्या www.bseindia.com आणि www.nseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

बुक क्लोझर

कंपनीजकायदा, २०१३च्या कलम ९१ च्या मान्यतेच्या अनुसार सभासदांची नोंदवह आणि कंपनीचीभाग हस्तांतरण वही बुधवार, २३ सप्टेंबर २०२० पासून गुरुवार २९, सप्टेंबर २०२० (दोन्ही दिवस धरून) एजीएमच्या कारणासाठी बंद ठेवण्यात येईल.

ई-मतदान

दि कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम२० सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८आणि वेळोवेळी फेरफार करण्यात आलेल्या कंपनी(व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१५ आणिसेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन आणि डीसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम ४४अनुसार सूचनेमध्ये देण्यात आलेल्या सर्व ठरावांवर विचार करण्यासाठी सभासदांना त्यांचे मतदान करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे देता येईल. प्रत्यक्षकिंवा अप्रत्यक्ष स्वरूपात कट ऑफ दिनांक मंगळवार २२, सप्टेंबर २०२० अनुसार भाग धारणा करणाऱ्या सभासदच केवळ त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये करू शकतात. कंपनी कायदा, २०१३च्या तरतूदी आणि त्याच्या अंतर्गत करण्यात आलेले नियम ह्यांच्या अनुसारतपशिल खालील प्रमाणे:

ई-मतदान सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ	शनिवार, २६ सप्टेंबर २०२०(सकाळी ९.०० वा. भाप्रवे)
ई-मतदानसमाप्तीचादिनांक आणि वेळ	सोमवार, २८ सप्टेंबर २०२०(सायं.५.०० वा. भाप्रवे)

ई-मेल आयडी नोंदविण्याचे/ अपडेट करण्याचे स्वरूप

१. एमसीए परिपत्रकाच्या अनुसार समभाग धारक ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही आणित्यामुळे ज्यांना ई-मतदान सूचना प्राप्त होऊ शकली नाही त्यांना त्यांच्या ई-मेल आयडीची नोंदतात्पुरत्या स्वरूपामध्ये कंपनीरजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट , बिग शेअर सर्व्हिसेसप्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्याकडे https://bigshareonline.com/investorRegistration.aspx ह्यालिंकवर क्लिक करून खाली नमूद करण्यात आलेली प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा ई-मेल आयडी तात्पुरतानोंद करता येईल.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपातः

(ए) https://bigshareonline.com/investorRegistration.aspx ह्यालिंकला भेट द्या
(बी) कंपनीच्या नावाची निवड करा
(सी) डीपीआयड-सीएलआयडी/ फोलियो क्र. आणि पेन क्र. ची नोंद करा.
(ई) ई-मेल आयडी आणि मोबाईल क्र. ची नोंद करा
(ई) यंत्रणेद्वारे क्लायंट आयडी आणि पेन क्र. चीतपासणी करण्यात येईल आणि त्यानुसार त्यांच्या वैध मोबाईल क्र. वर ओटीपी पाठविण्यात येईल.
(एफ)एसएमएसद्वारे पाठविण्यात आलेल्या ओटीपीनमूद करण्यात आल्या नंतर ई-मेल आयडी नोंद करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल (ओटीपी केवळ ५ मिनिटे वैध असेल)
(जी) त्यांनतर केवळ सूचना आणि वार्षिक आहवाल प्रपात होण्यासाठी ई-मेल ची नोंद करण्यात येईल.
(एच) त्यानुसार सिस्टीमद्वारे सूचना आणि ई-मतदानाची प्रक्रिया पाठविण्यात येईल.

प्रत्यक्ष प्रकारेः

(ए) https://bigshareonline.com/investorRegistration.aspx ह्यालिंकला भेट द्या
(बी) कंपनीच्या नावाची निवड करा
(सी) प्रत्यक्षफोलियो आणि पैन कार्ड क्र. ची नोंद करा
(डी) जर नोंदणीमध्ये पैन कार्ड उपलब्ध नसल्यास भाग्धराकाने त्याच्या प्रमाणपत्र क्र. नमूद करावा.
(ई) भागधारकाने त्याच्या ई-मेल आयडी आणि मोबाईल क्र. नोंदवावा.
(एफ) फोलियो आणि पैन कार्ड क्र./ भाग प्रमाणपत्र क्र. ह्याची वैधता तपासली जाईल आणि आणि त्यानुसार त्यांच्या वैध मोबाईल क्र. वर ओटीपी पाठविण्यात येईल.
(एफ) एसएमएसद्वारे पाठविण्यात आलेल्या ओटीपीनमूद करण्यात आल्या नंतर ई-मेल आयडी नोंद करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल (ओटीपी केवळ ५ मिनिटे वैध असेल)
(एच) जरपैन क्र. उपलब्ध असल्यासयंत्रणेद्वारे त्याची प्रत अपलोड करण्यात येईल.
(आय) यंत्रणेच्याद्वारे ई-मेल आयडीची नोंद करणायत येईल आणि
(जे) भागधारकाच्या द्वारे देण्यात आलेल्या ई-मेल आयडीवरत्यानुसार सिस्टीमद्वारे सूचना आणि ई-मतदानाची प्रक्रिया पाठविण्यात येईल.

२. हेस्पष्ट करण्यात येत आहे की कायमस्वरूपी ई-मेल आयडीची नोंद करण्यासाठी समभागधारकांना ह्याद्वारे विनंती करण्यात येत आहे की जर त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये भाग धारणा केली असल्यास त्यांच्या संबंधित पार्टीसिपंट यांच्याकडे नोंद करावी. नी जर प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली असल्यास कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्याकडे त्यांची नोंदणी करावी.
३. सभासद ज्यांनी ह्यापूर्वीच त्यांच्या ई-मेल्क आयडीची नोंद केलेई आहे त्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी त्यांचा ई-मेल आयडीची चालू ठेवावा.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
झेनिथ स्टील पाईप्स अँड इंडस्ट्रीज लिमिटेड
(पूर्वी झेनिथ बिर्ला (इंडिया) लिमिटेड म्हणून ज्ञात)
सही/ -
सुनील सुलेरे
कंपनी सचिव

दिनांक: ०७.०९.२०२०
ठिकाण: मुंबई

जे कुमार इन्फ्राप्रॉजेक्ट्स लिमिटेड

सीआयएन.एल ७४२१०एमएच१९९९पीएलसी१२२८८६
१६-ए, अंधेरी इंडस्ट्रीयल इस्टेट, बीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.
टेलि नं. (०२२)- ६७७४३५५५ फॅक्स क्र.: (०२२) २६७३०८१४ वेबसाईट- www.jkumar.com

२१वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि इव्हेंटची माहिती

या द्वारे सूचना देण्यात येते की, जे.कुमार इन्फ्राप्रॉजेक्ट्स लिमिटेड (या पुढे ‘‘कंपनी’’ असे म्हटले आहे) या कंपनीचट्या सभासदांची २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा (‘ई-एजीएम’) मंगळवार दि. २९ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता (भा.प्र.वेळ) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/ इतर श्राव्य-दृष्य साधनांमधून (ओएव्हीएम) पद्धतीने आणि एकाच समान जागेवर सभासदांची प्रत्यक्ष उपस्थितीविना आयोजित केली आहे. कंपनी व्यवहार सदस्याची सर्वसाधारण परिपत्रके क्र. १४/२०२०, १७/२०२० आणि २०/२०२० तसेच कंपनी कायदा २०१२ च्या लागू होणाऱ्या तरतुदी आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांच्या परिपत्रकाचे अनुपाल करून या सभेचे आयोजन केले आहे.
कंपनी रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, म्हणजे के फिन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (‘‘केफिन’’) यांनी तयार केलेल्या इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मद्वारे या ईजीएमला उपस्थित राहण्याची सोय सभासदांना उपलब्ध करून दिली आहे. सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी https://emeetingsfintech.com येथे भेट द्यावी आणि e-AGM-Video Conference यावर क्लिक करावे. आणि शेअर होल्डर/मेंबर लॉग-इन करावे. त्यासाठी उपलब्ध करून दिलेले ई-मतदानाचे अधिकार पत्रे वापरावी. या इ-एजीएमचे कामकाज कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे आयोजित केलेले आहे असे समजण्यात येईल आणि ते ई-एजीएमचा अभिमत जागा आहे, असे मानले जाते

बुक क्लोजर आणि लाभांश देणे

या कायद्याचे कलम ९१, ज्याचे वाचन कंपन्याचे (व्यवस्थापक आणि प्रशासन) नियमावली २०१४ यातील नियम १० आणि सूचीबद्धतेचे नियामके २०१५मधील नियामक ४२ यासोबत केले जाते. त्यानुसार या द्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीची शेअर ट्रन्सफर बुक्स ही बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२० ते मगंळवार २९ सप्टेंबर २०२० (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत सदर एजीएमचे कारणाकरिता वर्षिक बंद ठेवणे तसेच या एजीएममध्ये ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचा लाभांश मंजूर झाला तो देणे या उद्देशाने बंद ठेवण्यात येतील.
ज्या सभासदांचे इ मेल व तो कंपनीचे डिपॉझिटरी पार्टीसिपेंट्स/ के/फिन यांचेकडे नोंदलेले आहेत, आणि जे सभासद शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२० या कट ऑफ तारखेला कंपनीचे शेअर्स धारणकर्ते आहेत, त्यांना या ई.एजीएमच्या आयोजनाची सूचना, त्यात करावयाच्या सामान्य व विशेष कामकाजाची माहिती, त्यासंबंधीची स्पष्टीकरणाची टिपणी, ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचा कंपनीचा वर्षिक अहवाल, त्यासोबत संचालक मंडळाचा अहवाल आणि लेखा परिक्षकाचा अहवाल ही कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, शुक्रवार दि. ०४ सप्टेंबर २०२० रोजी पाठविण्यात आली आहे. ही कृती एम सी ए चा आणि सेबीच्या परिपत्रकांनुसार केली आहे. कंपनी कोणत्याही सदस्याला सूचना आणि वार्षिक अहवाल यांच्या मूर्त (कागदी) प्रती पाठविणार नाही. सूचनेची प्रत आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईट वर https://jkumar.com/investors/annualreportsfy-2020 येथे आणि केफिन ची वेबसाईट https;//evoting.kavvy.com/Downloads.aspx येथे आणि स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे उफलब्ध आहेत.
कायद्याचे कलम १०२, ज्याचे सहवाचन कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावलीतील नियम २० आणि सेबी एलओडीआरचे नियम ४४ सोबत केले जाते, त्यातील तरतुदीनुसार या सूचनेत दिलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे सभासदांना त्यांचे मतदान के-फिन (दूरवरून ई मतदान) या इलेक्ट्रॉनिक इ-व्होटिंग प्लॅटफॉर्मद्वारे दूरवरून करण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहे.
सदर दूरवरून इ- मतदान पद्धती शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ०९.०० वाजता (भा.प्रस वेळ) सुरु होईल आणि सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजता (भा.प्र.वेळ) बंद होईल. त्यानंतर दूरवरून ई-मतदान करण्याचे मोड्यूल निष्प्रभ/ब्लॉक केले जाईल. वर दिलेली तारीक व वेळ यानंतर दूरवरून मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. सभासदाने या इ एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावावर एकदा मत दिल्यानंतर त्यांना ते नंतर बदलण्याची परवानगी नाही. दूरस्थ इ मतदान पद्धतीत एकदा दिलेले मत अंतिम समजण्यात योल.
जे सभासद इ एजीएममध्ये उपस्थित आहेत आणि त्यांनी त्यापूर्वीच त्यांचे मत इ व्होटिंगमार्फत दिले नाही तसेच ज्या सदस्यांना अन्य प्रकारे मनाई केलेली नाही, अशा सभासदांना ई-एजीएममध्ये त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक रित्या करता येईल. ज्यात इ व्होटिंग मार्फत मतदान केले आहे अशा सभासदांना इ-एजीएम मध्ये भाग घेता येईल परपंतु त्यांना इ-एजीएमध्ये पुनः मतदान करता येणार नाही. ज्या व्यक्तीची नावे दि. २२ सप्टेंबर २०२० रोजी (कट ऑफ तारखेला) सभासदांचे रजिस्टर किंवा लाभार्थी मालकांचे रजिस्टर (डिपॉझीटर पार्टीसिपंट यांनी जतन केलेले रजिस्टर) यामध्ये नोंदले आहे, त्याचे मत दुरस्थ पद्धतीने किंवा एजीएमच्या वेळी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देता येईल. कट ऑफ तारखेत (२२ सप्टेंबर २०२०) रोजी सदस्य पूर्ण भरणा केलेले शेअर भांडवल ज्या प्रमाणात सभासद धारण करतात, त्याप्रमाणात सभासदांना मतदानाचा हक्क राहील. कट ऑफ तारखेत जे व्यक्ती सभासद नाही, त्याने ही सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे.
एजीएमची सूचना पाठविल्यानंतर जर कुणा व्यक्तीचे शेअर्स मिळविले असतील आणि ती व्यक्ती कट ऑफ तारखेला शेअर्स धारण करीत असेल तर, आणि जर त्याने या पूर्वीच के-फिन कडे ई- मतदानासाठी नोंदणी केली असेल तर त्याला विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्डचा उपयोग करून ई-वेहटिंगसाठी करता येइल किंवा एजीएम नोटीसमधील टिपा क्र. XXV या मध्ये दिलेली तपशीलवार प्रक्रीया वापरावी किंवा त्याने evoting@kfintech.com येथे विनंतीपत्र पाठवावे किंवा के फिन यांचा विनामूल्य फोन क३. १२००-४२५-८९९८/ १८००-३४५-४००१ येथे संपर्क करून मतदानासाठी यूजर आयजी आणि पासवर्ड मिळवावा.
जर आपणास दुरस्थ मतदान, व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे इ-एजीएममध्ये हजर राहणे किंवा इ-एजीएमच्या वेळी इ-मतदान करणे या विषयी कुठलीही शंका असेल तर आपण ‘हेल्प’ येथे आणि नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि इ-व्होटिंग अँड एजीएम व्हीसी/ओव्हीएम येथे उपलब्ध असलेले यूजर मॅन्यूअल बघावे. यूजर मॅन्यूअल https://evotingkarvy.com याच्या डाऊनलोड सेक्शनवर येथे उपलब्ध आहे. किंवा के फिन यांचे विनामूल्य फोन क्र. १८००-४२५-८९९८/ १८००-३४५-४००१ येथे आपण अडचणी सांगव्यात किंवा आपण इमेल evoting@karvy.com येथे पाठवावी. श्री. श्रीनिवास,मॅनेजर - कार्पोरेट रजिस्टई- के फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड- युनिट - जे कुमार इन्फ्राप्रॉजेक्ट लिमिटेड, चार्वी सेलेनियम टॉवर्स, बी, प्लॉट नं. ३१-३२, गाचीबावली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद ५६०-०३२ फोन संपर्क ०४० ६७१६२२२२ यांच्याशी संपर्क साधावा.
जे सभासद डिमटेरीयलाइज्ड स्वरूपात किंवा मूर्त स्वरूपात शेअर्स धारण करतात आणि ज्या सभासदांनी त्यांचा ईमेल पत्ता दिलेला नाही त्यांना दूरस्थ पद्धतीने मतदान करण्याची किंवा ई-एजीएममध्ये मतदान करण्याची पद्धथी इ-एजीएमच्या सूचनेत दिली आहे.

ई मेल नोंदणी करण्याची पद्धत

डी मॅट- शेअरधारक
संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपेंट यांच्याशी संपर्क करावा.

मूर्त स्वरूपातील शेअर धारण करणारे
कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, के फिन यांच्याशी संपकर्त करावा. त्यसाठी ईमेलने einward.ris@kfintech.com येथे विनंतीपत्र पाठवाले. त्यात ईमेल पत्ता, मोबाईल क्रमांक, पॅन कार्डाची स्वयं साक्षांकित केलेली प्रत आणि शेअर सर्टिफिकेटची प्रत पाठवावी.

शंबंधित छाननीकारांचे अहवाल किंवा गुरुवार दि. ०१ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा पूर्वी निकाल जाहीर केले जातील. आणि कंपनीची वेबसाईट www.jkumar.com या वेबसाईट आणि के फिनच्या वेबसाईट https//www.kfintech.com येथे दाखविले जाईल. तसेच ते स्टॉक एक्स्चेंज याना कळविण्यात येतील आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात प्रदर्शित केले जाईल.

जे. कुमार इंफ्राप्रॉजेक्ट लिमिटेड, करीता
स्वाक्षरी/ -
पुर्णिमा रेड्डी
कंपनी सेक्रेटरी

स्थळ : मुंबई
दि. : ०७ सप्टेंबर, २०२०